REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 9 | JUNE - 2022

# १८ व्या शतकातील पुणे प्रांतातील व्यापारी वस्तूंच्या किंमती

**डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट**
**सहयोगी प्राध्यापक, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**
**कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे.**

**प्रस्तावना:-**




१८ वे शतक हा मराठी राज्यकर्त्यांचा काळ मानला जातो. या काळात मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. या काळात मराठी साम्राज्य उभे राहिले त्याच बरोबर आर्थिक बाबतीत बदलाची प्रक्रीया सुद्धा दिसते. अठराव्या शतकात मराठी राज्याची अर्थव्यवस्था १७०७ ते १८१८ या काळात वाढत असताना दिसते. या काळातील बाजारपेठेतील विविध व्यापारी वस्तूंच्या किंमती हा एक अनोखा विषय आहे. सदर शोधलेखात तत्कालिन प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रांच्या आधारे १८ व्या शतकातील पुणे प्रांतातील बाजारपेठेतील वस्तूंच्या किंमती घेतलेल्या आहेत. या किंमतींची माहिती मिळावी तसेच त्याचे स्वरुप समझावे या उद्देशातून हे लेखन केलेले आहे. काळानुसार बाजारपेठेतील वस्तुंची अथवा विक्रेय घटकांत बदल होत असताना दिसतो. त्याचप्रमाणे त्यांची विक्रीपद्धत, किंमत या बाबी बदलताना दिसतात.

**⊖ स्त्री-पुरुष यांची खरेदी विक्री-**

अठराव्या शतकात माणसांची खरेदी-विक्री केली जात असे. माणसांच्या किमती सांगणे हे आज मानवता विरोधी मानले जाईल. अठराव्या शतकात मात्र ही सर्वसामान्य बाब होती. पोर्गा, पोरे, पोरगे याचा अर्थ गुलाम मुले किंवा पुरुष होय. कुणबीन, बटकी म्हणजे साधारणत: गुलाम स्त्री होय. गुलाम व्यक्तींची शारीरिक क्षमता, कौशल्य, दिसणे यानुसार त्यांच्या कमी जास्त किंमती असत. तुकोजी शिंदे यांनी मौजे मुलखेडे तर्फ कर्यात मावळ येथे तीन बटीक पोरे दिडशे रुपयांस विकत घेतली.[1] इ.स. १७७३-७४ मध्ये सुतमी मिर्धा याने वणजारे याजकडून २ पोर्गे विकत घेतले. त्यांची किंमत १३४ रु. होती.[2] इ.स. १७७३-७४ साली शासनाने दोन कुणबीणी विकत घेतल्या. त्या दोघींची किंमत १४० रु. होती.[3] इ.स. १७९०-९१ साली कलकत्तेकर इंग्रज याने आठ कुणबीनी विकत घेतल्या. त्यांची एकूण किंमत ५५ रुपये होती. अर्थात एकीची सुमारे किंमत ६॥।= पावणेसात रुपये आणि दोन आणे असावी.

## Θ जनावरंच्या किमती:-

### ➢ ऊंट-

इसवी सन १७५५-५६ साली खरेदी करण्यात आलेल्या ऊंटाची किंमत ३२० रु. होती. इ.स. १७६३-६४ च्या नोंदीनुसार ऊंट १४० रूपयांस खरेदी करण्यात आला होता.[4] ई. स. १७९०-९१ साली इंग्रजांनी पुण्यातून प्रति ऊंट सुमारे ४५० रूपयांच्या दराने १६ ऊंट खरेदी केले.[5] अठराव्या शतकात ऊंटांची किंमत सुमारे १२० ते ५०० रुपये या दरम्यान असे.

### ➢ हत्ती-

इ.स. १७६०-६१ साली पाच हत्ती ७५० रुपयांना खरेदी करण्यात आले होते.[6] इ.स. १७७६-७७ मध्ये रघोजी आंग्रे यांनी पुण्यात दोन हत्ती विकत घेतले. त्यांची किंमत एकत्रित रु. ५००० होती.[7] इंग्रजांनी पुण्यातुन खरेदी केलेल्या हत्तींची किंमत २००० रुपये एवढी होती.[8]

### ➢ घोडे व तट्टू-

इंग्रजांनी पुण्यातुन २३ घोडे खरेदी केले. त्यांची किंमत प्रति घोड्यास सुमारे १४० ते १५० रुपये एवढी होती.[9] इ.स. १७६३-६४ च्या नोंदीनुसार तट्टूची किंमत २५ रुपये होती.[10] इ.स. १७९०-९१ साली १६ रुपये प्रति तट्टू किंमत होती.[11]

### ➢ गाय व बैल-

इ.स. १७३२-३३ मध्ये बाळाजी बाजीराव पेशवे हे आलेगाव तर्फ पाटस येथे आले असता ओझ्यासाठी चार बैल घेतले. शासनाने प्रति बैलास ८ रुपये प्रमाणे चार बैलांचे ३२ रुपये खर्चास टाकले.[12] आळंदीचे यात्रेत ६ बैलांची खरेदी ६० रुपयांना करण्यात आली.[13] इ.स. १७६३-६४ साली बैलाची खरेदी किंमत रु. १८ असल्याची नोंद मिळते.[14] इ.स. १७७२-७३ मधील नोंदीनुसार शासनाने खरेदी केलेल्या गाईची प्रति गाय किंमत सुमारे ६॥ साडेसहा रुपये एवढी होती.[15]

### ➢ शेळया- मेंढ्या-

इ.स. १७५२-५३ साली बकरे दिड रुपया दराने विकले जात असत.[16] अठराव्या शताकात शेळया-मेंढ्यांची किंमत सुमारे १२ आणे ते दोन रुपये प्रति प्रमाणे असे.

## Θ फळांच्या किंमती -

१० नोव्हेंबर १७९४ च्या यादीतील नोंदी नुसार केळीचे १८ नग आठ आणे किंमतीस, पेरू ३६ नग चार आणे किंमतीस, डाळिंबे ५ नग दर चार आणे अशा किंमती होत्या.[17] इ.स. १८०६-०७ साली आंबे रुपायास ४० मिळत, केळी रुपयास ४८, नारळ रुपयास १४, डाळींब रुपयास २०, पेरू रुपयास ९३, निंबे रुपयास २९५ मिळत असत.

## Θ भाजीपाला-

१० नोव्हेंबर १७९४ च्या यादीतील नोंदीनुसार भाजीपाला किंवा माळवे याच्या किंमती पुढील प्रमाणे असत. गवारी शेंगा तीन आणे किंमतीस सव्वातीन पायली, भेंड्या पावणे तीन आणे किंमतीस सहा पायल्या, दोडके पावणे पाच आणे चार पायली अशा किंमती होत्या.[18] इ.स. १७०६-०७ साली दर रुपयास गवारी शेंगा चार पायल्या व पाच शेर, आठ पायल्या आणि आठ शेर, दोडके चार पायल्या आणि आठ शेर, वांगी आठ पायल्या आणि आठ शेर या दराने मिळत. अर्थात या वस्तुही महाग झाल्याचे दिसुन येते.

### ʘ किराणामाल-

इ.स. १७०६-०७ सालच्या निरखाच्या यादीमध्ये तांदूळाचे वीस प्रकार आहेत. त्यांच्या किंमती रुपयास सुमारे 66। चार पायल्या ते रुपयास 66२॥। पावणे तीन मण पर्यंत आहेत. इ.स. १७४८-४९ मधील किराणा मालाच्या प्रती मणाच्या किंमती पुढील प्रमाणे असत तुरदाळ व हरभरे डाळ- २ रू. २ आणे १ पैसा व १ पै तर हरभरे २ रू याप्रमाणे होत्या.[19] इ. स. १७७२-७३[20] गूळ एक रुपयास ५ पायली, ३ पावशेर, ३ छटाक मिळत असे तो इ.स. १८०६-०७ साली एक रुपयास साडेतीन पायली व साडेनऊ शेर मिळू लागला म्हणजे महाग झाला. इ.स. १८०६-०७ साली साखर रुपयास 66२6१४ या दराने मिळत असे. १७७२-७३[21] साली लवंगा एक रुपयास २ पायली मिळत; जायफल एक रुपयास २ पायली मिळत; मोरचूद रुपयास सव्वादोन पायली मिळे; मिठ एक रुपयास दिड मण, पाने खायची- एक आण्यास सुमारे ५० ते ५५ मिळत.[22] सुपारी इ.स. १७३९ मध्ये ५४ रु. प्रति खंडी / रुपयास पाच शेर होती. ती काही महिन्यामध्ये ती ६८ रुपये प्रति खंडी / एक रुपयास पाच शेर प्रमाणे झाली.[23] अशी किंमतींची माहिती मिळते.

इ.स. १७७२-७३ साली मापी दिल्या जाणाऱ्या वस्तुंचे दर एक रुपयास या प्रमाणे दिले आहेत. मिठ- रु. १ ला 6।॥•, कर्डी- १ रु. ला 6।।=, दाळ हरभरे- दर 6२, दाल उडीद- 6।•॥,[24] तर वजनी वस्तुंचे दर रुपयास तुप 6२, अंबाडी- 6७॥।४, लोकर- 6७6१३॥।, सुत- 6१॥१, गुळ, 6४॥।=, हळद- 6४, रुई- 6५, तेल- 6३॥।४, मसूर- 6।२, तेल चार रुपयास 6।१[25] याप्रमाणे असल्याचे दिसते.

इ.स. १७७२-७३ सालाच्या झडतीनुसार शासनाच्या गुरांसाठी कडबा पुळे खरेदी केली. त्याची किमंत दर हजारी ७ व ४॥ (सात व साडेचार) रुपये अशी होती.[26]

### ʘ दूध व तुप –

इ.स. १७४८-४९ दुध रुपयास मापी १२ शेर मिळत असे.[27] इ. स. १७६३-६४ साली व इ. स. १७९०-९१ तुप वजनी प्रति रुपयास 66४ होते[28] ते इ.स. १८०६-०७ साली चांगले तुप 66१॥।१६ एवढे मिळू लागले.[29] याचा अर्थ तुपाची किंमत वाढली.

### ʘ कागदाची किमंत –

कागदाचा प्रती दस्त २ 6= दोन रुपये आणि दोन आणे[30] या दराने मिळत असे. विशेष म्हणजे कागदाची निर्मिती पुणे व जुन्नर या ठिकाणी होत असे.

### ʘ सोने-

इ.स. १७९५ मध्ये सोने दर प्रती तोळा १६|| साडेसोळा रुपये होता.[31] इ.स. १७५३-५४ मध्ये सोने १६| रु. तोळा, चांदी- ३८||रु. भार हा दर होता.[32] इ.स. १८०६-०७ मधे चांदी- १४ आणे प्रति तोळा झाली.

### ʘ मौल्यवान खडे व मोती-

मिना लाल, हिरवा व सफेद प्रति नगास रू. ३४० ते ५२५ प्रमाणे मिळत. हिरे व हिरकण्या नगास रू. १०, २०, २५, २८, ४४ या दराने मिळत. लोलक मोती नगास रू. ३० ते ४५ प्रमाणे मिळत. पाचा लोलक मणी नगास रू. २ ते ५, मोती नगास रू. १।।, ४, माणिक प्रति नगास मणी- रू. २ याप्रमाणे किंमती होत्या.[33]

### ⊖ कापड दर-

कापड आख या परिमाणाने मोजले जात असे. त्यामुळे कापडाच्या किंमती रुपये पति आख या प्रमाणात येतात. पुढील किंमती कापडाचा प्रकार व किंमत प्रति आख अशा आल्या आहेत तर काही विशिष्ट कापडाचे प्रकार प्रति नगास किंमती दर्शवितात. इ.स. १७२७ साली चिमाजी आप्पाने श्रीवर्धनवरून मागविलेल्या वस्तूंचे प्रति नग दर: सुसी पातळांचे (साड्यांचे) दर ४॥ व ५ रु, तर गजण्या ६ ते ७ रु.[34]या प्रमाणे होते. तसेच छिटे जाजम- १||=, खादी पांढरी- १||=[35], इ.स. १७४५-४६ साली दिल्ली वरून शासनाने आणलेल्या वस्तुंचे दर छिट कापड – ४० रु. जोडी; शालजोड्या- उंच १००, इतर ७५, ५०, ४० रु., शालनामे- बुट्टेदार ५०, इतर १५०, १०० रु.; रजया- उंची १० दर ६०, उंची १५ दर ४०; रुमाल लोकरीचे- दर १५ व ३० रु. इ.[36] पायागड वरुन आणलेलेया वस्तू (१७५०-५१)- किनखापे(जरीचे कापड) उत्तम दर प्रत्येकी १२५, १००, ७५ तर दुय्यम- ६०, ४०, ३०, २५ व विविधरंगी- १५०, १७५,२००; पटके – अहमदाबादी प्रती नगास दर १५, २०, २५, ३०,४०; वेलबुट्टीदार रेशीम (हमरु)- नगास १२, १५, २०; गजनी (रेशीम व सुताचे मिश्र कापड) दुरंगी- नगास ५ रु., उंची- १८, २०,२५; जनानी (स्त्रियांना वापरायचे कापड) नगास २०, २६, ३०; मर्दानी (पुरुषांचे कापड) नगास १२, १४,१५; जनानी-पटनी- प्रती नगास ५०; मखमल तागे पंचरंगी रेशमी- लाल १५, २०, २५; काळी १५, २०,२५; लहंगे –उंच तऱ्हेदार ४०, ५०, ७५, उखान (दुय्यम) २५, ३०, ३५, मुलींचे २५,३०, ४०, ५०; पटके- देवासाठी १०, १५, २०, इलाचे पंचरंगी १०,उंची १००,१२५; पारचे उंची ७५; ईलाचे यांचे फडके- ५०, ७५; चोळीचे ईलाचे- १५ रु.; बाफ्ते (सुती कापड)- उंची खाशा पोशाखा योग्य २५, ४०, ५०.[37] शेला- नगास रू. दिड[38] अशा कापडाच्या किंमती होत्या. इ.स. १७९०-९१ सालचे दर- खादी प्रती आख 6|||=, छिटाचे कपड- १6≡।[39] गोणपाट- १॥ रू., साध्या पासोड्या- १ रु. १ आणा व १पै. या प्रमाणे दर होते.

### ⊖ धातुच्या व अवजड वस्तु-

इ.स. १७७२-७३ कोळसा दर खंडीस रु. १५, चुना कळी खंडीस १२ रु. प्रमाणे तर लोखंड १ रुपयास ३ पायली व ९ छटाक (6३6९), पोलाद इंग्रजी १ रुपयास सव्वा दोन पायली (6॥-) व १ रुपयास दिड पायली व ९ छटाक (6१।९)[40] अशा प्रकारचे दर होते.

इ.स. १७७२-७३ साली धातुच्या वस्तू खरेदी केल्या त्यांची किंमत प्रति नगास रुपये या प्रमाणे दर्शविली आहे. पितळी- २॥ रू., तांब्याचे तपेले- ३ रू., कढई मोठी- ४२ रू., बुधले- १। रू. अशा प्रकारे किंमती होत्या. इ.स. १७७० साली फेब्रुवारी महिन्यात मुंबईवरून तीन घड्याळे मागविल्याचा संदर्भ येतो. 'थोर घड्याळे दोन हातभर उंच आणि लहान डबीवजा येक' असा उल्लेख येतो. त्यांची किंमत प्रत्येकी ३५० रुपये होती.[41]

### ⊖ लाकूड -

फांटी (जळाऊ लाकूड)- प्रति खंडी रू.३,[42] पुलासाठी वापरण्याची तुळई २५ रु. प्रति नग, सोळक्या- २० रु. नग, बारीक तुळई – १५ रु. प्रति नग, पुलाच्या विसक्या ३० रु प्रति नग प्रमाणे,तुळया सर्वात मोठ्या ३७॥ रु व सर्वात लहान १० रु. प्रति नग.[43] अशा प्रकारे लाकडाच्या किंमती होत्या.

## ⊖ किंमतवाढीचा तुलनात्मक तक्ता-

सदरचा तक्ता वा. दि दिवेकर यांच्या 'अठराव्या शतकातील पुण्याचे अर्थ-चित्र' या पुणे शहर एका संचिताचा मागोवा या पुस्तकातील लेखातून घेतला आहे.

**पुणे बाजारपेठेतील अन्नधान्याचे बाजारभाव**[14]

| अ.न. | पंचवार्षीके | सरासरी किंमत एक रुपयास किलो | |
|---|---|---|---|
| | | ज्वारी | बाजरी |
| १ | १७६१-६५ | २६.५७ | २१.२६ |
| २ | १७६६-७० | १९.८० | २०.१४ |
| ३ | १७७१-७५ | २४.०७ | १९.१४ |
| ४ | १७७६-८० | २२.६२ | २१.८३ |
| ५ | १७८१-८५ | २९.२६ | २७.६८ |
| ६ | १७८६-९० | २५.३० | २२.३० |
| ७ | १७९१-९५ | १७.६२ | १४.८९ |
| ८ | १७९६-१८०० | १६.७८ | १४.९० |
| ९ | १८०१-०५ | २१.०४ | १४.८४ |
| १० | १८०६-१० | १९.५९ | १८.३१ |
| ११ | १८११-१५ | २०.८७ | १७.५१ |
| १२ | १८१६-२० | २३.७२ | १८.५६ |

तक्ता क्र. १ मध्ये ज्वारी व बाजरीच्या इ.स. १७६१ – ६५ ते इ.स. १८१६-२० या काळातील किंमतींचा तुलनात्मक तक्ता दिला आहे. त्यातून ज्वारी व बाजरी या मुख्य अन्नधान्य असलेल्या दोन घटकांची किंमतवाढ लक्षात येईल.

एकूणच या माध्यमातून १८ व्या शतकातील पुणे प्रांतातील बाजारपेठांत उपलब्ध घटकांच्या, वस्तूंच्या किंमती आपणास पहावयास मिळतात. या काळातील वस्तूंच्या किंमतींची तुलना ठिकाणे आणि कालखंडानुसार करता येणे शक्य आहे परंतू तुलना करताना काही अडचणी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्या काळात दळणवळणाची व संपर्काची साधने अत्यंत मर्यादित होती आणि त्यामुळे बाजारपेठांमध्ये एकाच वेळी स्थानिक मागणी व पुरवठ्याच्या स्थिती नुसार किंमतींमध्ये अस्थिरता दिसुन येते. त्या काळातील परिमाणे आणि खरेदी-विक्रीपद्धत याद्वारे आपणास समजते. यातून १८ व्या शतकातील किंमतींचा आढाव घेता येतो.

---

[1] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.- 191.

[2] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-VIII, Sawai Madhavarav Peshwe, Vol-III, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Maraathe A. B.*, Poona, 1911, P.- 248.

[3] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-VIII, Sawai Madhavarav Peshwe,Vol-III, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Maraathe A. B.*, Poona, 1911,P.- 249.

[4] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- ५२९, झडती, जकात, अर्बा सितैन.

[5] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्र. ५२९, जमा सालमजकूर (खतावणी), इहिदे तिसैन.

[6] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.- 185.

[7] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-VIII, Sawai Madhavarav Peshwe,Vol-III, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Maraathe A. B.*, Poona, 1911,P.- 243.

[8] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्र. ५२९, जमा सालमजकूर (खतावणी), इहिदे तिसैन.

[9] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्र. ५२९, जमा सालमजकूर (खतावणी), इहिदे तिसैन.

[10] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- ५२९, झडती, जकात, अर्बा सितैन.

[11] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्र. ५२९, जमा सालमजकूर (खतावणी), इहिदे तिसैन.

[12] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- ४२७, तर्जुमा जिल्हे, सलास सलासीन.

[13] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.- 183.

[14] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- ५२९, झडती, जकात, अर्बा सितैन.

[15] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सबैन.

[16] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.- 215.

[17] सदाशिव आठवले, **तुळशीबागवाले दप्तर**, संपादक डॉ. श्री. मा. भावे, भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, पुणे, वर्ष ७६, अंक १ - ४, जुलै १९९७ ते एप्रिल १९९८, प्रस्तावना पृ.१०९-११०.

[18] सदाशिव आठवले, **तुळशीबागवाले दप्तर**, संपादक डॉ. श्री. मा. भावे, भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, पुणे, वर्ष ७६, अंक १ - ४, जुलै १९९७ ते एप्रिल १९९८, प्रस्तावना पृ.१०९-११०.

[19] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.-183.

[20] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सबैन.

[21] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सबैन.

[22] विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (संपा.); **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड- ६ वा, श्रीसमर्थप्रसाद प्रकाशन, १९०९, पृ.- ०४.

[23] **पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद** खंड- १७, गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, पृ. ९९.

[24] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सबैन.

[25] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सबैन.

[26] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सलासीन.

[27] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.-183.

[28] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्र. ५२९, जमा सालमजकूर (खतावणी), इहिदे तिसैन.

[29] पुणे पुरालेखागार, जकात दप्तर, रूमाल क्र. ११५, यादी, निरखनामा, सबा मयातैन अलफे.

[30] सदाशिव आठवले, **तुळशीबागवाले दप्तर**, संपादक डॉ. श्री. मा. भावे, भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, पुणे, वर्ष ७६, अंक १ - ४, जुलै १९९७ ते एप्रिल १९९८, प्रस्तावना पृ. १४६.

[31] सदाशिव आठवले, **तुळशीबागवाले दप्तर**, संपादक डॉ. श्री. मा. भावे, भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, पुणे, वर्ष ७६, अंक १ - ४, जुलै १९९७ ते एप्रिल १९९८, प्रस्तावना पृ. १४८.

[32] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Bajirav II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, P.- 29.

[33] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-V, Bajirav Peishwa, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, 1908, P.- 181.

[34] **पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद** खंड- १८, गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, पृ. २-३.

[35] सदाशिव आठवले, **तुळशीबागवाले दप्तर**, संपादक डॉ. श्री. मा. भावे, भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, पुणे, वर्ष ७६, अंक १ - ४, जुलै १९९७ ते एप्रिल १९९८, प्रस्तावना पृ. १४१.

[36] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.- 147.

[37] *Ganesh Chimnaji Wad,* **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-II, Balaji Bajirav Peishwa, Vol. II, Published by Deccan Vernacular Translation Society, by *Parasnis*, D. B., Poona, *Indu Prakash* Press, P.- 151-153.

[38] विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (संपा.); **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड- ६ वा, श्रीसमर्थप्रसाद प्रकाशन, १९०९, पृ.- ०४.

[39] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्र. ५२९, जमा सालमजकूर (खतावणी), इहिदे तिसैन.

[40] पुणे पुरालेखागार,पुणे, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २६, हिसेब, सलास अर्बेन.

[41] **पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद** खंड- ३२, गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, पृ.६०-६१.

[42] विश्वनाथ काशिनाथराजवाडे (संपा.); **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड- ६ वा, श्रीसमर्थप्रसाद प्रकाशन, १९०९, पृ.-०४.

[43] पुणे पुरालेखागार, पेशवे दप्तर, प्रांत अजमास, पुणे, रुमाल क्रमांक- २७, झडती, सलास सबैन.

[44] वा. द. दिवेकर,, 'पेशवेकालीन पुण्याचे अर्थ-चित्र', लेख अंतर्भूत अरुण टिकेकर, , **पुणे शहर एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा**, खंड-१, लिमये फौंडेशन, साधना प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २०००, पृ.५५४.